# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४९९/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १३/०९/२०१८

## शांतता समीती बैठक संपन्न

भंडारा:– भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस मुख्यालय येथील बहुउद्देशीय सभागृह येथे दिनांक १२/०९/२०१८ रोजी मा. श्री. विनीता साहू पोलीस अधिक्षक भंडारा यांचे अध्यक्षतेखाली शांतता समीतीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमा प्रसंगी परिवीक्षाधिन पोलीस उपअधिक्षक स्वप्नील जाधव, श्री. संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा, श्री. चव्हाण ठाणेदार भंडारा, श्री. गजानन कंकाळे ठाणेदार कारधा, विवीध सामाजीक संघटनांचे प्रतिनिधी, गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी, डि. जे. चालक व मालक, महिला दक्षता समिती सदस्य, सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष कार्यक्रमाला उपस्थीत होते.

यावेळी पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी डी. जे. ला बंदी नाही तर आवाजाला बंदी आहे. गणपती विर्सजन दिलेल्या वेळेत करणे. गणेश उत्सवा बरोबर, मोहरम येत आहे. मोहरमला ज्या सवा–या निघतात त्यावेळी वादय वाजवु नये तरी सर्वानी आपली जवाबदारी समजुन किंवा कोणतेही गोष्ट घडणार नाही यांची काळजी घेणे. मिरवणुका दरम्यान योग्य ती काळजी घेणे, सण, उत्सवा दरम्यान एकमेकांस समजुन घेणे. तरी सर्व नागरीकांचे कर्तव्य आहे. की, त्यांनी पोलीसांना योग्य ते सहकार्य करणे त्यामुळे होणाऱ्या अप्रिय घटना थांबविता येवु शकतात. आपल्या डोळयासमोर एखादी घटना दंगल भांडण होत असेल तर लगेच पोलीसांना कळविणे अशी माहीती दिली.

पोलीस निरीक्षक कारधा श्री. पोलीस निरीक्षक गजानन कंकाळे यांनी आपले मार्गदर्शनत गणपती मांडताना घ्यावयाची काळजी जसे रोडाचे कडेला मंडप न घालणे येणा–या जाणा–या रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. तसेच मंडप डेकारेशन लावतांना नोंदणीकृत करुन घेणे मंडप लावतांनी एनोसी घेणे. तसेच आक्षेपार्य देखावा न लावणे, सिसीटीव्ही कॅमेरा लावणे. पारंपारीक वस्तुचा वापर करणे. गणपती विर्सजन करतांना कोणत्याही प्रकारची दुर्घटना होणार नाही. वादय वाजविण्याची वेळ ठरवुन दिलेल्या वेळेत वाजवणे. समाजात व्हॉट्सअप तसेच फेसबुक यामाध्यमातून कोणतेही चुकीचे मॅसंज पोस्ट करु नका. त्यामुळे धार्मीक भावना दुखावल्या जाणार नाही याची काळजी घेतली पाहीजे. या उत्सवा पासुन संकल्प करण्याचे कळविले की डी. जे मुक्त गणपती पार पडणार याबाबत माहीती दिली.

सुधाकर साठवणे पिंडकेपार जिल्हा पोलीस पाटील संघटना अध्यक्ष यांनी सांगीतले की, डी. जे. बंदी हा एक कोर्टाचा निर्णय असल्याने काटेकोरपणे त्याचे पालन करणे सर्वाचे कर्तव्य आहे. सर्वाना आपल्या सण धर्माचे उत्सव साजरे करण्याचा अधिकार आहे. मात्र ते शांततेत पार पाडणे. कोणालाही पोलीस संरक्षण मागण्याची वेळ पडणार नाही स्वतालाच आपण समजायचे की मी एक पोलीस आहे.

अर्जुन शहारे तंटामुक्ती अध्यक्ष आपल्या देशात गौरवशाली गणेशोत्सव होतात. उत्सहातुन आंनद व्यक्त केला जातो.

संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा यांनी मार्गदर्शनपर भाषणात या समाजात सर्व जाती, धर्माचे लोक जिल्हयात राहतात. व आपल्या रितीरिवाजाप्रमाणे सण त्योहार साजरे करतात. या सणादरम्यान कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही वाद, दंगली, अपघात अश्या घटना घडू नये याकरीता कांही नियम ठरवलेले असतात. त्या नियमांचा पालन करणे हे सर्वाचे कर्तव्य आहे. मागील वर्षी संपुर्ण महाराष्ट्रात गणपती उत्सवा दरम्यान वेगवेगळया कारणावरुन २९४ गुन्हे दाखल झाले होते. तसे यावर्षी होणार नाही ही सर्वाची जवाबदारी आहे. गणपती उत्सवा दरम्यान विनापरवाना गणपती बसवणे. सार्वजनीक गणपती मांडण्याकरीता धर्मदाय आयुक्ताची परवानगी घेणे आवश्यक आहे. सुजान नागरीकांकडून पुढाकार घेणे अपेक्षित आहे. लहान सहान कारणावरुन क्षुल्लक कारणावरुन गुन्हे दाखल होतात. अवैधरित्या पुस्तका छापुन ते जाणे येणा–यांना वाटल्या जातात. ते टाळले पाहीजे. कारण ड्रायव्हर बाहेरचे असल्यास ते वाद घडवून आणु शकतात. ध्वनी प्रदुषण नाईज लेवल मिटर ५५ डी. पेक्षा जास्त नसणे. मुर्ती विसर्जनाला नेतांना दिलेल्या वेळेत मुर्ती विसर्जन झाली पाहीजे. व्हॉट्सअॅपवर चुकीची बातमी न टाकणे. विसर्जन करतांना पाण्यात उतरलेले लोक बरोबर परत आले की नाही याकडे पुढारी व्यक्तीने लक्ष दयावे. मिरवणुका दरम्यान ट्रॅक्टर चालक त्याचे जवळ परवाना आहे किंवा नाही यांची खात्री करणे. कोणतेही घटना घडणार नाही. याकडे लक्ष दिले पाहीजे.

विनीता साहू पोलीस अधिक्षक भंडारा यांनी आपल्या मार्गदर्शनात सुप्रीम कोर्टाने जे आदेश दिले. सोशल मिडीया पासुन सावध रहा. चुकीची माहीती पोस्ट केल्यास किंवा कोणत्याही गुन्हा घडवून आणल्यास तरुण मुलांवर गुन्हे लागतात. त्याना नौकरी करीता पोलीस व्हेरीफिकेशन गरज असते. त्यात सर्व गोष्टी बघितल्या जातात. गणेशोत्सवादरम्यान असे काही ठेवा त्यातुन तुम्हच्या गावात तुमचे वर्षानुवर्ष तुमचे नाव घेतील असे काही करा. सर्वानी एकोप्यांने सण, उत्सव साजरा करण्यास कळविले.

श्री. चव्हाण पोलीस निरीक्षक यांनी सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.